४)

क्रमांक./पोअवा/लेशा/आकस्मिक खर्च/घबांअ/२०१९, /1541
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
दिनांक:- 15 FEB 2019

**घरबांधणी अग्रीम/कर्ज मंजूरी आदेश**

संदर्भ- १) शासन निर्णय क्र-वित्त विभाग क्र-घबांअ/२०१२/विनियम, दि-२०/०२/२०१५
२) शासन निर्णय क्र-गृहविभाग बीयुडी ०११७/प्रक्र-२/आस्था-१, दि-१०/०४/२०१७
३)शासन निर्णय क्र-गृहविभाग बीयुडी ०११७/प्रक्र-२/आस्था-१, दि-१९/०८/२०१७
४)मा.पोलीस महासंचालक कार्यालयाचे आदेश क्र-पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/१७/२०१८, दि-०७/०४/२०१८
५)मा.पोलीस महासंचालक कार्यालयाचे आदेश क्र-पोमसं/३१/३९-१/घबांअ-बँक कर्ज/९०/२०१८,दि-१७/०५/२०१८
६) क्रमांक पोमसं/३१/३९-०१/घबांअ(ॲक्सीस-Pay-pro)/७३/२०१८ मुंबई दिनांक ७/२/२०१८.

विषय- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा.पोलीस महासंचालक कार्यालयाचे आदेश क्रमांक पोमसं/३१/३९-०१/घबांअ(ॲक्सीस-Pay-pro)/७३/२०१८ मुंबई दिनांक ७/२/२०१८.अन्वये पोलीस अधिक्षक, वाशिम कार्यालयाच्या आस्थापनेवरिल **०८ पोलीस कर्मचारी यांना आय.सी.आय.बँक ली.** या वित्तीय संस्थेमार्फत घरबांधणी अग्रीमाकरिता मंजूर करण्यात आलेली कर्जाची रक्कम रू-**१४९२१०००/-( रुपये एक कोटी एकोनपन्नास लक्ष एकविस हजार फक्त)चे आदेश** प्राप्त झालेले आहे.

यास्तव **शासन निर्णय वित्त विभाग क्र-विअप्र-२०१३/प्रक्र-३०/२०१३/विनियम भाग-२, दि-१४/०४/२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८, भाग पहिला, उपविभाग एक, मधील अनुक्रमांक ११, नियम १३४** अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कार्यालय प्रमुख म्हणून मी सोबत जोडलेल्या यादिमधील नमुद **अक्र- ०१ ते ०८** मध्ये नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेली घरबांधणी कर्जाची रक्कम मंजूर करण्याकरिता तसेच प्रदान करण्या करिता मान्यता देत आहे.

**रोखपाल, लेखाशाखा** यांनी सोबत जोडलेल्या यादिमधील नमुद अक्र- ०१ ते ०८ मध्ये नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेली घरबांधणी कर्जाची रक्कम रू-**१४९२१०००/-( रुपये एक कोटी एकोनपन्नास लक्ष एकविस हजार फक्त) ॲक्सीस बँकेच्या पे-प्रो** या ऑनलाईन प्रणाली मार्फत प्रदान करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.

**वेतन लिपीक-२** यांनी सोबत जोडलेल्या यादिमधील नमुद अक्र-०१ ते ०८ मध्ये नमुद पोलीस कर्मचारी यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या तक्त्याप्रमाणे माहे मार्च च्या वेतनामधून प्रथम मुदलाची व तदनंतर व्याजाची वसूली ही बँक लोन -१ मध्ये वेतन लिपीक यांनी करावी. व त्याबाबतचे डीस्ट्रीब्युशन रोखपाल यांचेकडे दरमहा सादर करावे. (कपातीचे स्वतंत्र आदेशप्राप्त झाल्यानंतर)

**आस्थापना लिपीक** यांनी सोबत जोडलेल्या यादी मधील नमुद अक्र-०१ ते ०८ मध्ये नमुद पोलीस कर्मचा-यांच्या सेवापटामध्ये अग्रीम/कर्ज मंजूरीबाबत आवश्यक ती नोंद घ्यावी.

**रोखपाल, रोखशाखा** यांनी घरबांधणी अग्रीम कर्ज वसूलीची रक्कम दरमहा वेतन जमा झाल्याच्या दुस-या दिवशी DG OF POLICE HOUSE BUILDING ADVANCE या नावाच्या ॲक्सीस बँकेतील खाते क्र- ९१७०२००८०५२५०२७, IFSC CODE- UTIB०००११२४ मध्ये जमा करावी. आणी MSPHC या मोडयुलमध्ये त्याक्षणी नोंद घ्यावी. तसेच सदरचा UTR क्रमांक त्यामध्ये नोंदवावा. खालील प्रमाणे जमा करण्याबाबतची कार्यवाही न चूकता करावी.

शासन निर्णय क्र-वित्त विभाग क्र-घबांअ/२०१२/विनियम, दि-२०/०२/२०१५ मधील तरतुदीनुसार अग्रीमधारक/ कर्जधारकांनी पुढील ६ महिन्यांचे आत मंजूर अग्रीम/कर्जाचा विनियोग करून, पुढीलप्रमाणे कागदपत्रे या कार्यालयास **दि-०१/०८/२०१९** पर्यंत सादर करावीत.

**१)गहाणखत २)मुद्रांक पावती ३) घराचा विमा ४) उपयोगीता प्रमाणपत्र ५)जागेचे खरेदीखत (मुळ)**

दि-०१/०८/२०१९ ते दि-२०/०८/२०१९ या कालावधीमध्ये सोबत जोडलेल्या यादिमधील नमुद अक्र-०१ ते ०८ वरील कर्मचारी अग्रीम/कर्जधारकांनी मंजूर रकमेचा विनियोग केला अगर कसे? **याबाबतची तपासणी स्वतः आकस्मिक लिपीक एका पोलीस शिपाई सह स्वतः करतील. व त्याबाबतचा अनुपालन अहवाल दि-२१/०८/२०१९ रोजी आम्हास सादर करतील.**

शासन निर्णय क्र-वित्त विभाग क्र-घबांअ/२०१२/विनियम, दि-२०/०२/२०१५ मधील परिच्छेद क्र-८(१२) नुसार घरबांधणी अग्रीम कर्जाच्या रकमेच्या नियमित व योग्य वसुलीसाठी **अग्रीमधारक स्वतः जबाबदार** राहतील. अग्रीमधारक अनधिकृत रजेवर राहील्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहीला, अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रीम कर्ज नियमीत परतफेड करण्यास **संबंधित अग्रीमधारक स्वतः जबाबदार राहतील.**

घरबांधणीसाठी बँकेमार्फत मंजूर करण्यात आलेली कर्जाची रक्कम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केलेली आहे त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रीम/कर्ज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून **अग्रीमाची रक्कम, प्रचलीत व्याजदर तसेच २.७५% दंडनिय व्याजासह** एकरकमी वसूल करण्यात येईल.

घराच्या किंमती इतका **घराचा विमा** शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रीमधारक/ कर्जधारकाने नोंद घ्यावी. तसेच **विम्याची एक प्रत न चुकता या कार्यालयास सादर करावी.**

अग्रीमधारकांचे घरबांधणी करिता कर्ज मंजूर झाल्याबदल अभिनंदन व स्वतःचे घर साकारण्या करिता **हार्दिक शुभेच्छा!**

**( मोक्षदा पाटील )**
**पोलीस अधिक्षक, वाशिम.**

**प्रत माहितीकरिता सविनय सादर-**

१)मा.पोलीस महासंचालक , पोलीस महासंचालक कार्यालय,म.रा.शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०০००१ .

२)मा.पोलीस उपमहानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

**प्रत-माहिती व प्रसिध्दीकरिता रवाना-** १)डीजीपी लिपीक / संगणक कक्ष, पो.अ.कार्यालय, वाशिम.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना-**

१)रोखपाल, रोखशाखा, पो.अ.कार्यालय, वाशिम.

२)अधिकारी आस्थापना लिपीक, पो.अ.कार्यालय, वाशिम.

३)वेतन लिपीक-२, पो.अ.कार्यालय, वाशिम.

४)प्र.कार्यालय अधिक्षक, पो.अ.कार्यालय, वाशिम.

५)खालील सर्व संबंधितांना /-

१) शेषराव दामोधर जाधव ब.नं.२०४ नेमणुक पो.स्टे.कारंजा ग्रामीण

२) मंगेश भाऊराव लव्हाळे ब.नं.१०६ नेमणुक पो.स्टे.धनज.

३) गोपाल शंकरराव पांडे ब.नं.१३३१ नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर.

४) सचिन देविदास इंगोले ब.नं.९६४ नेमणुक पो.स्टे.धनज

५) चेतन संतोषराव गावंडे ब.नं.९९० नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर.

६) मिथुन लक्ष्मण सोनोने ब.नं.१९५ नेमणुक पो.स्टे.कारंजा ग्रामीण.

७) उमेश रामचंद्र चव्हाण ब.नं.१३११ नेमणुक पो.स्टे.कारंजा शहर.

८) अमित दादाराव भगत ब.नं.३११ नेमणुक पो.स्टे.कारंजा ग्रामीण.

DC-1129

संगणक कक्ष,वाशिम
आवक / जावक 235
15/2/15